दि. 30 जून रोजी सेवानिवृत झालेल्या/होणा–या कर्मचा–यांना ज्यांनी मागील 12 महिन्यांची अर्हताकारी सेवा केलेली आहे अशा सर्व सेवानिवृत्त कर्मचा–यांना लगतच्या 1 जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृतीवेतन निश्चित करुन त्याबाबत सेवानिवृत्तवेतन विषयक लाभाचे सन 2023–24 (पुरवणी) आणि 2024–25 या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रक तयार करणेबाबत.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
(अर्थ व प्रशासन विभाग)

## परिपत्रक

जावक क अप्रवि/पीईएन/30 जून अंदाजपत्रक/2024–25/796 /2023 दि. 04/08/2023

**वाचा** :– 1) शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. वेतन–2023/प्र.क्र.13/सेवा–3, दि. 28 जून, 2023.
2) कुलसचिव कार्यालय यांचे परिपत्रक क.बीजीए/पेन्शन/07/2023/1236 दि.01 ऑगष्ट 2023.

उपरोक्त संदर्भास अनुसरुन विद्यापीठातील सर्व कार्यालये व महाविद्यालये तसेच विद्यापीठ संलग्न असलेले शासन मान्य अनुदानीत महााविद्यालये, कृषि शाळा, शिक्षण संस्था इ. सूचित करण्यात येते की, संदर्भांकित शासन परिपत्रक दि.28 जून 2023 च्या अनुषंगाने आणि मा.कुलसचिव, डॉ.पंदेकृवि, अकोला यांनी निर्गमित केलेल्या दि. 01 ऑगष्ट 2023 च्या परिपत्रकान्वये नियतवयोमानानूसार दि.30 जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणा–या कर्मचा–यांची माहिती त्यांच्या मूळ सेवापुस्तकातील साक्षांकित नोंदीवरुन पडताळणी करुन घ्यावी व ज्यांची मागील 12 महिन्यांची अर्हताकारी सेवा केलेली/झाली आहे अशा सर्व सेवानिवृत्त वेतनधारकांना लगतच्या 1 जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेवून सुधारित सेवानिवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय करण्याकरीता, ज्या सेवानिवृत्त वेतनधारकांनी अर्ज सादर केलेला आहे त्यांनी अर्ज केलेल्या दिनांकाच्या मागील 3 वर्षाची थकबाकी अथवा त्यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक यापैकी जे कमी असेल तितकी थकबाकी देण्यात यावी. परंतु असे सेवानिवृत्तीविषयक लाभ प्रदान करण्याकरीता अंदाजपत्रकात तरतूद होणे आवश्यक आहे.

याकरीता संबंधीत विभागाने सन 2023–24 चालू आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात पुरवणी मागणीव्दारे आणि सन 2024–25 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात नियमित मागणीव्दारे निवृत्तीवेतन या लेखाशिर्षांतर्गत अनुदान प्राप्ती करीता या परिपत्रकासोबत सहपत्रित केलेले प्रपत्र क.1 ते 4 मधील माहिती अर्थ व प्रशासन विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना दि.11/08/2023 पुर्वी पोहचेल या बेताने न चुकता पाठवावी.

उपरोक्त प्रपत्राव्दारे प्राप्त माहिती संकलीत करुन शासनाकडे सेवानिवृत्ती व लेखाशिर्षांतर्गत अनुदानाची मागणी करावयाची असल्याने सदर माहिती प्राधान्याने देण्यात यावी. माहिती अप्राप्त असल्याकारणाने जर कोणत्याही सेवानिवृती वेतनधारकास निवृत्तीवेतन विषयक लाभ प्रदान न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत विभागाची राहील.

नियंत्रक
डॉ पंजाबराव देशमूख कृषि विद्यापीठ, अकोला

प्रतिलीपी:

1. नियंत्रण अधिकारी/ आहरण व संवितरण अधिकारी/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख (सर्व)
2. प्राचार्य ————————————————————
3. वेतन व लेखाधिकारी, अकोला / नागपूर यांना कार्यवाही करीता अग्रेषित.
4. कुलसचिव, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त संदर्भांकीत परिपत्रकान्वये विद्यापीठातील सन 2023–24 (पुरवणी) आणि 2024–25 या आर्थिक वर्षातील दि.30 जुन रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणा–या कर्मचा–यांचे (नांव, पदनाम, अंतिम वेतन, निवृत्त दिनांक व विभाग) यांची माहिती आपल्या अधिनस्त असलेले निवृत्ती वेतन कक्षाकडुन पाठवावी ही विनंती.
5. प्रभारी अधिकारी, संगणक केंद्र, संशोधन संचालनालय, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना सूचित करण्यात येते की, सोबत जोडलेले अंदाजपत्रकाची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

### प्रपत्र–क 1

सन 2023–24 या आर्थिक वर्षाकरीता (पुरवणी मागणी) उपरोक्त संदर्भास अनुसरुन दिनांक 30 जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या व ज्यांनी मागील 12 महिन्यांची अर्हताकारी सेवा केलेली आहे अशा सर्व सेवानिवृत्त कर्मचा–यांना लगतच्या 1 जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन त्याबाबतची माहिती.

| अ. क. | सेवानिवृत्त कर्मचा–यांचे नांव व पदनाम | जन्म दिनांक | सेवेत रुजू झाल्याची दिनांक | सेवानिवृत्तीचे वर्ष (दि.30 जून प्रमाणे) ज्यांनी मागील 12 महिन्यांची अर्हताकारी सेवा केलेली आहे | सुधारीत सेवानिवृत्तवेतन लाभ अनुज्ञेय करण्याबाबत कर्मचा–यांनी कार्यालयास अर्ज दाखल केलेला दिनांक | दिनांक 30 जून रोजीचे असुधारित अंतिम वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

| एकुण अर्हताकारी सेवा कालावधी वर्ष / महीने / दिवस | सेवा निवृत्तीच्या दिनांकास मागील दहा महिण्याचे सरासरी सुधारीत अंतिम वेतन | मागील 3 वर्षांची थकबाकी अंदाजीत रक्कम | सेवा निवृत्तीच्या दिनांकास सुधारीत केलेले अंतिम मुळ वेतन | सुधारीत मुळ अंतिम निवृत्ती वेतनावर अनुज्ञेय महागाई वाढ रक्कम | एकुण बेरीज (11+12) | एकुण 12 महिण्याची प्रस्तावित मागणी |
|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| | | | | | | |

कार्यालय प्रमुखांची सही व शिक्का

आहरण व संवितरण अधिकारी सही व शिक्का

### प्रपत्र–क 2

### रजारोखीकरण तरतूदीची मागणी

### सन 2023–24 या आर्थिक वर्षाकरीता (पुरवणी मागणी)

| अ. क. | सेवानिवृत्त कर्मचा–यांचे नांव व पदनाम | दिनांक 30 जून रोजी सेवानिवृत्तीचे वर्ष | सेवानिवृत्तीच्या दिनांकास कर्मचा–यांच्या खाती शिल्लक असलेली एकुण अर्जीत रजा | अर्जीत रजेच्या गणनेनुसार सुधारित देय रजारोखीकरण रक्कम | अर्जीत रजेच्या गणनेनुसार असुधारित देय रजारोखीकरण रक्कम | एकुण देय रजारोखीकरण थकबाकी रक्कम (5–6) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

कार्यालय प्रमुखांची सही व शिक्का

आहरण व संवितरण अधिकारी सही व शिक्का

### प्रपत्र–क 3

सन 2024–25 या आर्थिक वर्षाकरीता उपरोक्त संदर्भास अनुसरुन दिनांक 30 जून रोजी सेवानिवृत्त होणा–या व ज्यांनी मागील 12 महिन्यांची अर्हताकारी सेवा पुर्ण करीत असलेल्या अशा सर्व सेवानिवृत्त कर्मचा–याना लगतच्या 1 जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन त्याबाबतची माहिती. ( कालावधी दि.01/03/2024 ते दि. 28/02/2025)

| अ. क. | सेवानिवृत्त कर्मचा–यांचे नांव व पदनाम | जन्म दिनांक | सेवेत रुजू झाल्याची दिनांक | सेवानिवृत्तीचे वर्ष (दि.30 जून प्रमाणे) ज्यांनी मागील 12 महिन्यांची अर्हताकारी सेवा केलेली आहे | एकुण अर्हताकारी सेवा कालावधी वर्ष / महीने / दिवस | सेवानिवृत्तीच्या दिनांकास असलेले मागील दहा महिण्याचे सरासरी अंतिम वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

| मागील 3 वर्षाची थकबाकी अंदाजीत रक्कम | सेवानिवृत्तीच्या दिनांकास असलेले अंतिम मुळ वेतन | अंतिम मुळ निवृत्ती वेतनावर अनुज्ञेय महागाई वाढ रक्कम | एकुण बेरीज 9+10 | एकुण 12 महिण्याची प्रस्तावित मागणी |
|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 |

कार्यालय प्रमुखांची सही व शिक्का

आहरण व संवितरण अधिकारी सही व शिक्का

### प्रपत्र–क 4

### रजारोखीकरण तरतूदीची मागणी

### सन 2024–25 या आर्थिक वर्षाकरीता

| अ. क. | सेवानिवृत्त कर्मचा–यांचे नांव व पदनाम | दिनांक 30 जून रोजी सेवानिवृत्तीचे वर्ष | सेवानिवृत्तीच्या दिनांकास कर्मचा–यांच्या खाती शिल्लक असलेली एकुण अर्जीत रजा | एकुण रजारोखीकरण प्रदेय रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे नोंदविलेली माहिती कर्मचा–यांच्या मुळसेवा पुस्तीकेमधील नोंदीच्या आधारे घेतलेली असून ती पडताळणी केली असून बरोबर आहे.

कार्यालय प्रमुखांची सही व शिक्का

आहरण व संवितरण अधिकारी सही व शिक्का